वाचले

१) मा.आयुक्त सो.यांचा दि.२७/०५/२०२२चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ , माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माशि/१/कावि/ ५२८ /२०२२
दि.२९/०७/२०२२

विषय :-"प्रयोगशाळा परिचर" पदावरील कर्मचा-यांच्या नियतकालीन बदल्यांबाबत..

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील माध्यमिक शिक्षण विभागातील प्रयोगशाळापरिचर यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने त्यांच्या नावापुढे स्तभ ०४ मध्ये दर्शविलेल्या विद्यालयामध्ये बदलीने पदस्थापना देणेत येत आहे.

| अ. क्र. | प्रयोगशाळा परिचरांचे नाव | सध्याचे विद्यालय | बदलीचे विद्यालय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीम.गायकवाड शंकुतला मिलिंद | मा.वि.पिंपळेगुरव | मा.वि.कासारवाडी |
| २ | श्री.सांगवे किर्तीकुमार पृथ्वीराज | मा.वि.संततुकारामनगर | मा.वि.खराळवाडी |
| ३ | श्री.तारू उमेश आनंदगिरी | मा.वि.केशवनगर | मा.वि.संत तुकारामनगर |
| ४ | श्री.गोपाळे निवृत्ती रघुनाथ | मा.वि.काळभोरनगर | मा.वि.आकुर्डीऊर्दू |
| ५ | श्री.काकडे रामदास दुलाजी | मा.वि.नेहरूनगर | मा.वि.भोसरी |
| ६ | श्री.जगताप सुभाष अनंत | मा.वि.कासारवाडी | मा.वि.पिंपळेगुरव |
| ७ | श्री.धुर्वे सुदाम अश्रुबा | मा.वि.खराळवाडी | मा.वि.थेरगाव |
| ८ | श्री.शिंदे मुकुंदा तुकाराम | मा.वि.थेरगाव | मा.वि.केशवनगर |
| ९ | श्री.पवार सरोजा नरहरी | ऊर्दूमा.वि.आकुर्डी | मा.वि.काळभोरनगर |
| १० | श्री.रामाणे रामचंद्र भिकाजी | मा.वि.भोसरी | मा.वि.नेहरूनगर |

उपरोक्त कर्मचा-यांस बदलीचे ठिकाणी रूजु होणेकामी या आदेशान्वये तात्काळ कार्यमुक्त (stand Released) करणेत येत असुन,त्यांनी बदली दिलेल्या विद्यालयात दि.०२/०८/२०२२ पर्यत रूजु होऊन,रूजु अहवालाची एक प्रत माध्यमिक शिक्षण विभागाकडे पाठविण्याची दक्षता घ्यावी.उपरोक्त कर्मचा-यांनी आदेशाच्या दिनांकापासुन १५ दिवसाचे आत,लेखी स्वरूपात कार्यभार हस्तांतरण करावे व तसा अहवाल संबधित मुख्याध्यापकांनी द्यावा, अन्यथा सदर कर्मचारी हे प्रशासकीय कारवाईस पात्र राहतील याची त्यांनी नोंद घ्यावी.बदलीच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता संबधित माध्यमिक विद्यालयांनी सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१) माध्यमिक विभागामार्फत करण्यात आलेल्या बदल्या ह्या सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व शैक्षणिक कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने बदलीने पदस्थापना करण्यात आलेल्या आहेत.

२) बदलीबाबतचे आदेश संबधीत विद्यालयांना पाठविण्यात येत असुन सर्व विद्यालयांनी पर्यायी कर्मचारी हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या कर्मचा-यांना तात्काळ आदेश बजाविणेत यावेत.सदरचे आदेश हेच कार्यमुक्तीचे असुन संबधीत विद्यालयांनी स्वत्रंत आदेश निर्गमीत करण्याची आवश्यकता नाही.

३) उपरोक्त कर्मचा-यांचे आदेशाचे दिनांकापर्यत गोपनीय अहवाल माध्यमिक शिक्षण विभागाकडे पाठविणेची संबधीत विद्यालयांनी दक्षता घ्यावी.

४) बदली करण्यात आलेल्या कर्मचा-यांनी नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रूजु /हजर न झाल्यास,बदली आदेशाची अवमान केल्यास,प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे राजकीय दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या गोपनीय अहवालात त्याबाबतची नोंद घेण्यात येईल,तसेच राजकीय दबावाबाबतची कृती महाराष्ट्र

नागरी सेवा(वर्तणूक)नियम,१९७९ मधील नियम ३ (३) व २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ती गैरवर्तणूक समजून त्यांच्या विरूध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल,याची स्पष्ट नोंद घेण्यात यावी.

५) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ मधील नियम ३० (सी) नुसार मुळ कार्यालयाने बदली झालेले कर्मचारी यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारू नये.असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबधित कर्मचारी त्यांच्या मुळ पत्यावर नोंदणीकृत देय डाकेने परत करावेत.

६) उपरोक्त नियतकालिन बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामुळे बदली झालेले सर्व कर्मचा-यांचे माहे – ऑगस्ट -२०२२ पासून चे वेतन कोणत्याही परिस्थीतीत बदलीपुर्वीच्या विद्यालयातुन काढण्यात येउ नये.सदर वेतन संबधित कर्मचारी बदलीच्या विद्यालयात हजर झाल्यानंतर बदली नंतरच्या विद्यालयाने काढावे व तसा अहवाल माध्यमिक विभागास सादर करावा,तसेच उपरोक्त कालावधितील वेतन बदलीपुर्वी कार्यरत असलेल्या विद्यालयातुन मुख्याध्यापकांनी अदा केल्यास त्यांना व्यक्तीश: जबाबदार धरणेत येवून त्यांचे वर नियमाधिन कारवाई करणेत येईल अशा सुचना सर्व विद्यालयांना देणेत येत असुन लेखाविभागाने वेतन बिलांची अदायगी करताना तशी दक्षता घ्यावी.

सदर आदेशाची नोंद संबधीतांचे मुळ सेवानोंद पुस्ताकात घेणेत यावी.

सही/-
( राजेश पाटील )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८

प्रति,सर्व संबधित कर्मचारी
प्रत,
१)लेखा विभाग
२)प्रशासन विभाग टेबल क्र.२२, संगणक कक्ष
३)पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ
४)पिं.चिं. माध्यमिक शिक्षकांची पतसंस्था
५) संबधित विद्यालये

(संदीप खोत)
उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८